भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक –२९/०७/२०१८

- प्रेसनोट –

## सराईत वाहन चोराकडुन मौजमजेसाठी चोरी केलेल्या ६ दुचाकी जप्त.

---

दिंनाक.२८/०७/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उपनिरिक्षक दत्तात्रय मोहिते व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी उज्वल मोकाशी व पो शि शिवदत्त गायकवाड यांना त्याच्या बातमीदारामार्फतीने बातमी मिळाली की, दोन इसम हे एका स्प्लेडर मो सा वरुन दत्तनगर चौकाकडुन जाभुंळवाडी रोड येथे गेले असुन त्याच्याकडे असणारी मो सा हि चोरीची असल्याच्या संशय आहे. सदर इसमापैकी दोन्ही इसमाची केस हे वाढलेले असुन त्यादोघांनी फुल बायाचा टिशर्ट घातलेला आहे. तेव्हा आम्ही जांभुळवाडी रोडने सदर इसमाचा शोध घेत असता मिळालेल्या वर्णनाप्रमाणे दोन इसम हे आम्हाला एम एस ऑल व्हिव सोसायटीच्या समोरुन जाताना त्यांना शिताफिने ताब्यात घेवुन आरोपी नामे १ योगेश नवनाथ वजाळे, वय २० वर्षे, रा. घोरपडी वस्ती, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे यास पकडण्यात आले आहे व विधीसंघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेण्यात आले आहे.

वरिल योगेश नवनाथ वजाळे, हा रेकार्ड वरिल गुन्हेगार असल्याने त्याच्याकडे अधिक तपास करता त्याने त्यागाडया मौजमजेसाठी चोरुन पेट्रोल संपल्यानंतर सोडुन देत होता. त्यांनी भारती विदयापीठ, स्वारगेट, हडपसर परिसरातुन दुचाकी चोरल्याचे कबुली केले.

<u>सदर आरोपी यांच्याकडुन १ ॲक्टिवा, २ पल्सर, १ स्प्लेडर, १ आर वन फाईव्ह, १ पॅशन प्रो अशा २,००,०००/- रु किंमतीच्या एकुण ०६ मो सा जप्त करण्यात आल्या आहेत.</u>

आरोपी योगेश नवनाथ वजाळे हा रेकॉर्ड गुन्हेगार असुन त्याच्यावर यापुर्वी हडपसर, कोढवा, यवत, लोणी काळभोर, भारती विदयापीठ, पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री ज्योती प्रियासिंग सो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते, पोलीस कर्मचारी उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड, प्रणव संकपाळ, गणेश चिंचकर, महेश मंडलीक, अभिजीत रत्नपारखी, चंद्रकांत फडतरे, दिपक माने, कृष्णा निढाळकर, अमोल पवार, कुंदन शिदे, सर्फराज देशमुख यांनी केलेली आहे.